सं.फौ.ख.क्र. ६६०/२०२२

सरकार ..वि.. प्रकाश

**निशाणी क्र. ११ खाली**

MHWS090012962022

# न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक ०५.०८.२०२५)

१. प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्र. १ ते ५ यांचे विरुध्द महा. जुगार कायदयाचे कलम १२(अ) अन्वये दोषारोप ठेवला, सदरचा दोषारोप आरोपींना समजावुन सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व न्यायालयीन संपरिक्षेची मागणी केली. आरोपी विरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ एकमेव साक्षीदार साक्षीदार क्र. १ नामे विशाल श्रावण चव्हाण (घटनास्थळ जप्तीपंच साक्षीदार) यांचा पुरावा सादर केला. आरोपींविरुध्द पुरक पुरावा उपलब्ध नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) नुसार त्यांचे बयाण नोंदविण्यात आले नाही.

२. अभियोग पक्षाचे कथन, अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा व दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुद्दे माझे विचारार्थी उपस्थित होतात, त्यांच्या कारणासह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २०.०८.२०२२ रोजी १६:०० वाजताचे सुमारास ग्राम–आसोला खु., ता. मानोरा, जि.वाशिम येथील टिनाचे शेडमध्ये सार्वजनिक ठिकाणी आरोपी वरली मटक्याचा जुगाराचा खेळ खेळत असताना त्यांचे ताब्यातून बावन ताश पत्ते, नगदी रु.२२,१२०/– चार मोबाईल व दोन मोटरसायकल मिळून आले व त्याप्रमाणे आरोपींनी महा. जुगार कायदयाचे कलम १२(अ) अन्वये दंडनिय अपराध केला ? | ... नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

मुद्दे क्र. १ व २ करीताः

३. साक्षीदार क्र.१ विशाल यांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यांनी त्यांचे समक्ष पोलीसांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार करण्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. सदरील साक्षीदाराने घटनेबाबत काहीही कथन केले नाही. त्यामुळे त्याचे साक्षीवर विश्वास ठेवता येत नाही.

४. अभियोगपक्षास पुरेपुर संधी देऊनही त्यांनी प्रकरणातील इतर स्वतंत्र व प्रत्यक्ष साक्षीदार तसेच दुसरे पंच, फिर्यादी व तपासिक अंमलदार यांना पुराव्या कामी हजर केले नाही. साक्षीदारांच्या पुरक पुराव्याअभावी घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी कथित मटक्याचा जुगाराचा खेळ खेळत असताना मिळून आले म्हणून आरोपींनी महा. जुगार कायदयाचे कलम १२(अ) अन्वये दंडनिय अपराध केला आहे, अशी धारणा करता येत नाही. गुन्हयाचे घटक सिध्द करण्याइतपत पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. करीता मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

५. पुरेशा पुराव्याअभावी आरोपींना दोषी ठरविता येत नाही. म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आ. क्र.१ **प्रकाश सकलाल चव्हाण**, आ.क्र.२ **कैलास काशिराम राठोड**, आ.क्र.३ **दिनेश शिवलाल तुनगर**, आ.क्र.४ **कैलास दामु महिंद्रे** व आ.क्र.५ **जगदिश मधुकर जाधव** सर्व रा. ग्राम–आसोला खु., ता. मानोरा, जि.वाशिम यांची महाराष्ट्र जुगार कायद्याचे कलम १२(अ) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

सं.फौ.ख.क्र. ६६०/२०२२
सरकार ..वि.. प्रकाश
**निशाणी क्र. ११ खाली**

३. प्रकरणातील जप्त मुद्देमाल बावन ताश पत्ते मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे. तसेच रोख रक्कम रु.२२,१२०/–अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे शासन जमा करण्यात यावी.

४. जप्त मुद्देमाल दोन मोटरसायकल व एक टेक्नो कंपनीचा मोबाईल या अगोदरच सुपुर्तनाम्यावर सोडण्यात आलेली आहे. करीता सदर जप्त मुद्देमालाबाबत कोणताही आदेश पारीत करण्यात येत नाही.

५. प्रकरणातील इतर तिन मोबाईल यांची यापुर्वी कुणीही मागणी केली नसल्यास त्यांचा जाहीर लिलाव करुन आलेली रक्कम नियमाप्रमाणे शासन जमा करण्यात यावी.

६. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ)ची पुर्तता करण्याकरीता जमानत दयावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2025.09.12 11:29:02 +0530

(ज. तु. कोरेगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
(न्यायालय क्र.१), मानोरा.

दि. ०५.०८.२०२५

सं.फौ.ख.क्र. ६६०/२०२२
सरकार ..वि.. प्रकाश
**निशाणी क्र. ११ खाली**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | – | Smt. R. K. Chavhan (Grade–III) |
| Court | – | CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | – | 05/08/2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | – | 05/08/2025 |
| Judgment/Order uploaded on | – | 12/09/2025 |